# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

## परिपत्रक क्र.२१२/२०१९

**विषय** : संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था यांनी त्यांच्या स्तरावर अभिलेख/माहिती जतन करून ठेवण्याबाबत.

**संदर्भ** १. मे. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपिलार्थी डॉ. सुसी कुरीआकोसे यांच्या माहिती अधिकार अधिनियमांतर्गतच्या द्वितीय अपिलामध्ये दि. ४.१.२०१९ रोजी पारित केलेला आदेश.

२. मा. सहसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्रमांक संकीर्ण.२०१९/प्र.क्र.१५९/विशि.३, दि. २१ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले निर्देश.

वरील संदर्भाकिंत विषयास अनुसरुन असे निर्देश देण्यात येत आहेत की, सार्वजनिक न्यास व इतर कायद्याखाली नोंदणीकृत संस्थांद्वारे संचलित व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शासकीय अनुदानाशी संबंधित/विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रकारच्या अनुदानाशी संबंधित सर्व प्रकारचे अभिलेख/कागदपत्र प्राचार्य/संचालक अथवा एका प्राधिकृत अधिकाऱ्याकडे जतन करून ठेवावेत. तसेच शिक्षण संस्थेच्या अभिरक्षेत (In Custody) असलेले अभिलेख/कागदपत्र हे संस्थेच्या सचिव/चिटणीस/सरचिटणीस अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे जतन करून ठेवावेत व माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सदर माहिती मागविणारा अर्ज महाविद्यालय/परिसंस्थेस/शिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यास अथवा विद्यापीठाकडून आदेशीत करण्यात आल्यास सदरची माहिती अर्जदारास उपरोक्त अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन पुरविण्यात यावी. विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुदानाशी संबंधित/शासकीय अनुदानाशी संबंधित माहिती जतन करून ठेवण्यात आली नसल्याचे आढळून आल्यास त्या पुढील कोणत्याही अनुदानास संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/शिक्षण संस्था पात्र ठरणार नाही. तसेच दिलेल्या अनुदानाच्या वसुलीबाबत जरूर ती कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीस अनुसरुन होणाऱ्या शास्तीस संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

..२..

वरील निर्देश हे मे. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांनी पारित केलेल्या आदेशास अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्गमित केलेल्या संदर्भांकित पत्रास अनुसरून देण्यात येत आहेत. सदर पत्राची प्रत या सोबत संबंधितांच्या अवलोकनार्थ जोडण्यात आली आहे.

गणेशखिंड, पुणे—४११००७ )
जा.क्र. साफुपुवि/निववि/५०८ )
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९ )

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

प्रति,

१) मा. अध्यक्ष/सचिव,
विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था चालविणाऱ्या शिक्षण संस्था.

२) मा. प्राचार्य/मा. संचालक,
विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था.

३) मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ

४) माहिती अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ

## महाराष्ट्र शासन

क्रमांक:- संकीर्ण - २०१९/प्र.क्र.१५९ /विशि -३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २१ जुन, २०१९

प्रति,

१) संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

२) संचालक,
तंत्र शिक्षण,
मुंबई.

३) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत...

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी डॉ. सुसी कुरीआकोसे यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जाची सुनावणी दि. ०६.१२.२०१९ व दि. ०८.०९.२०१९ रोजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई यांजकडे पार पडली. सदर व्दितीय अपील सुनावणी प्रकरणी दि. ०८.०१.२०१९ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

२. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी खालीप्रमाणे निर्देश दिले आहेत.

" आयोग, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (८) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण ), अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) प्रधान सचिव (वैद्यकिय शिक्षण) व या प्रकरणाशी संबंधित मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी सार्वजनिक न्यास व इतर कायद्याखाली नोंदणीकृत संस्थाव्दारे संचलित, शासन अनुदानप्राप्त महाविद्यालय, विद्यालये व शाळा यांना मान्यता किंवा अनुदान देताना अशी अट समाविष्ट करावी की, शासकिय अनुदानाशी निगडित सर्व प्रकारचा अभिलेख त्या त्या शैक्षणिक संस्थांमध्ये एका प्राधिकृत

अधिका-याकडे ठेवावा व माहिती अर्ज आल्यास जन माहिती अधिका-यांमार्फत ती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार देण्यात यावी."

आपणांस असे कळविण्यात येते की, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांना कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करण्यात यावे.

(सिध्दार्थ खरात)
सहसचिव(महाराष्ट्र शासन)

प्रत माहितीस्तव सादर :-

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, नविन प्रशासकिय भवन, मुंबई - ४०० ००३२.
३) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
४) सहसचिव, (वि.शि)/उप सचिव (मशि)/उप सचिव (ताशि)/उप सचिव (साशि) , उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
५) कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.
६) निवडनस्ती.

CR/159.

45
28/1/19

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 664
दि. 29/05/19

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४१७५

State Information Commission
Greater Mumbai

अपिलार्थी डॉ. सुसी कुरीआकोसे
पलॅट नं. ६, उत्कर्ष, १०३५, जे.अे.राऊळ मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
भारतीय विद्या भवन, कुलपती के.एम.मुन्शी मार्ग, चौपाटी, मुंबई – ४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी
भारतीय विद्या भवन, कुलपती के.एम.मुन्शी मार्ग, चौपाटी, मुंबई – ४०० ००७.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.१२.२०१८ व ०८.०१.२०१९

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दि. | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दि. | प्रथम अपील दि. | प्रथम अपील आदेश दि. |
|---|---|---|---|
| १०.०४.२०१८ | २०.०४.२०१८ | १९.०५.२०१८ | ३१.०५.२०१८ |

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. ०८.०८.२०१८ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपिलावर दि. ०६.१२.२०१८ रोजीची सुनावणी अंशत: घेऊन ती पुन्हा दि. ०८.०१.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली.

दि. ०८.०१.२०१९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने असे विशद केले की, त्यांनी भारतीय विद्या भवन यांना दि. १०.०४.२०१८ रोजी माहिती अर्ज सादर करून डॉ. सुसी कुरीआकोसे यांना निलंबित व बडतर्फ करण्याबाबत भारतीय विद्या भवन गव्हर्निंग कमिटीची जी बैठक दि. २०.०३.२००९ व दि. १२.०६.२००९ रोजी घेण्यात आली त्या बैठकीचे नोटीस, अजेंडा व इतिवृत्त तसेच, विद्यापीठाला त्या विषयी पाठविलेल्या अहवालाची प्रत विचारली होती.

भारतीय विद्या भवनने ती संस्था शासन अनुदानित नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अखत्यारीत येत नाही या कारणामुळे माहिती नाकारली. अपिलार्थीनी त्याच्या समर्थनास केंद्रीय माहिती आयोगाने अपील क्रमांक : CIC/SS/A/२०११/०००३४० मधील दि. ०४.०८.२०११ रोजी पारीत झालेल्या आदेशाचा तसेच, मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक २६/२०११,चेअरमन, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या प्रकरणी दि.१८.१०.२०१२ रोजी पारीत केलेल्या आदेशाचा आधार घेतला. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामध्ये शैक्षणिक संस्था संचालित करीत असलेले सार्वजनिक न्यास हे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सार्वजनिक प्राधिकरण आहे, असा निर्णय देण्यात आला होता.

भारतीय विद्या भवन (संस्था) च्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, भारतीय विद्या भवन या संस्थेला शासनाकडून भरीव आर्थिक सहाय्य देण्यात येत नाही. ते संचालित करीत असलेले हजारीमल सोमाणी विद्यालय हे शासन अनुदानित असले, तरी शासनाचे अनुदान त्या विद्यालयाला थेट प्राप्त होते. त्याच्या समर्थनास त्यांनी राज्य माहिती आयोगाने दि. २९.०९.२०१० रोजी अपील क्र.२००९/५७०५/०२ याचा तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाने, Civil Appeal No. ९०१७ of २०१३ (Arising Out of SLP (C) No. २४२९० of २०१२) Thalappalam Ser. Co-op. Bank Ltd. And others Versus State of Kerala and others मध्ये दिलेल्या आदेशाचा आधार घेतला. याशिवाय त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने, एस.एल.पी. क्रमांक ६४/२००९ मधील आदेश, तसेच दिल्ली व केरळ उच्च न्यायालयाचे काही आदेश त्यांच्या समर्थनास सादर केले. मुंबई उच्च न्यायालयाने दि. २०.०३.२०१३ रोजी एल.पी.ए.क्र. ४८/२०१३ - The Appellate Authority & Chairman Shikshan Prasarak Mandali & Anr. Vs. The State Information Commissioner & Anr. मध्ये रिट पिटीशन क्र. २६/२०११, एल.पी.ए.क्र. ४९/२०१३ मध्ये रिट पिटीशन क्र. २७/२०११, एल.पी.ए.क्र. ५०/२०१३ मध्ये रिट पिटीशन क्र. २८/२०११, एल.पी.ए.क्र. ५१/२०१३ मध्ये रिट पिटीशन क्र. २९/२०११ व एल.पी.ए.क्र. ५२/२०१३ मध्ये रिट पिटीशन क्र. ३०/२०११ मध्ये आदेश देऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रिट पिटीशन क्र. २६/२०१७- शिक्षण प्रसारक मंडळी यामधील आदेशाला दिलेली स्थगिती कायम आहे, असाही युक्तिवाद केला.

थलप्पलम बँक प्रकरणी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा आधार घेऊन त्यांनी असा युक्तिवाद केला की, भारतीय विद्या भवन या संस्थेवर शासनाचे प्रत्यक्ष नियंत्रण नाही. संस्थेला भरीव शासकीय अनुदान प्राप्त होते हे सिध्द करण्याची जबाबदारी थलप्पलम निर्णयानुसार अपिलार्थींची असून, त्यांनी त्याबद्दल तथ्य सादर केलेले नाही. अपिलार्थींनी विचारलेली माहिती सार्वजनिक हितामध्येही नसून वैयक्तिक माहिती आहे.

अपिलार्थींनी यावर असा युक्तिवाद केला की, संस्थेमध्ये नियुक्त होणारे अधिकारी व कर्मचारी हे शासन किंवा विद्यापीठाच्या मान्यतेच्या आधारावर नियुक्त केले जातात व संस्था महाविद्यालयाच्या कारभाराबद्दल शासनाच्याप्रती उत्तरदायी आहे.

दोन्ही पक्षांनी सादर केलेला युक्तिवाद विचारात घेतल्यावर आयोग पुढील निष्कर्षाप्रत येत आहे:

मा. सर्वोच्च न्यायालयाने Civil Appeal No. ९०१७ of २०१३ (Arising Out of SLP (C) No. २४२९० of २०१२) Thalappalam Ser. Co-op. Bank Ltd. And others Versus State of Kerala and others या निर्णयामध्ये खालील अभिप्राय नोंदविले आहेत.

*" The burden to show that a body is owned, controlled or substantially financed or that a non-government organization is substantially financed directly or indirectly by the funds provided by the appropriate Government is on the applicant who seeks information or the appropriate Government and can be examined by the State Public Information Officer, State Chief Information Officer, State Chief Information Commission, Central Public Information Officer etc. when the question comes up for consideration. A body or NGO is also free to establish that it is not owned, controlled or substantially financed directly or indirectly by the appropriate Government.".*

या प्रकरणी अपिलार्थी, उक्त संस्थेस भरीव अर्थसाह्य प्राप्त होते असा पुरावा देऊ शकले नाहीत.

संस्थेवरील नियंत्रणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रकरणी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत:

*"We are of the opinion that when we test the meaning of expression " controlled" which figures in between the words "body owned" and "substantially financed", the control by the appropriate government must be a control of a substantial nature. The mere 'supervision' or 'regulation' as such by a statute or otherwise of a body would not make that body a "public authority" within the meaning of Section 2(h)(d)(i) of the RTI Act."*

शासन, भारतीय विद्या भवन संस्थेच्या कामामध्ये सविस्तर नियंत्रण करते, असे सिध्द होत नाही. अपिलार्थीचा प्रमुख युक्तिवाद मुंबई उच्च न्यायालयाने शिक्षण प्रसारक मंडळी, रिट पिटीशन क्र २६/२०११ मध्ये पारीत झालेल्या आदेशाच्या आधारावर होता. ज्यामध्ये, अनुदानित शैक्षणिक संस्था संचालित करणारे ट्रस्ट हेदेखील माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सार्वजनिक प्राधिकरण आहे, असा निर्णय देण्यात आला होता. या निर्णयाला उच्च न्यायालयाने उक्त संदर्भित एल.पी.ए. अंतर्गत दिलेली स्थगिती अद्याप कायम आहे, ही बाबसुध्दा निर्विवाद आहे. म्हणून उक्त निर्णयाच्या आधारावर भारतीय विद्या भवन ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही. त्या दृष्टीने संस्थेने या माहिती अर्जाविषयी घेतलेली भूमिका योग्य आहे **म्हणून सदर द्वितीय अपील मान्य करता येणार नाही.**

आयोगाचा निष्कर्ष वरीलप्रमाणे असला, तरी अपीलकर्ते शासन अनुदानित हजारीमल सोमाणी विद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत होत्या. त्यांना निलंबित व बडतर्फ करण्यात आले, ही बाब निर्विवाद आहे. यासंबंधी संस्थेच्या गव्हर्निंग कमिटीने बैठक घेऊन त्यांना निलंबित व बडतर्फ करण्याबद्दल निर्णय घेतला, ही बाबसुध्दा संस्थेने नाकारलेली नाही. तसेच, त्यासंबंधीचा अभिलेख त्यांच्याकडे नाही, अशी भूमिकाही घेतलेली नाही. प्राचार्य किंवा इतर प्राध्यापक व कर्मचारी, ज्यांचे वेतन

शासनाच्या अनुदानातून दिले जाते, त्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया शासनाच्या मान्यतेने होत असते. शासकीय अनुदानाशी निगडीत सर्व निर्णय-कामांशी संबंधित अभिलेख सार्वजनिक अभिलेख असून तो नागरिकांना माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्रकट करणे क्रमप्राप्त आहे. अशा संस्थांनी असा अभिलेख ते संचालित करीत असलेल्या अनुदानित महाविद्यालय, विद्यालय किंवा शाळांमध्ये प्राचार्य किंवा

त्यांना योग्य वाटेल अशा नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे जतन करण्याची व्यवस्था केली पाहिजे, जेणेकरुन, माहितीचा अधिकार अर्ज प्राप्त झाल्यावर त्या आधारे माहिती नागरिकांना देण्याकरिता उपलब्ध होऊ शकेल. अन्यथा अनुदानित विद्यालय सार्वजनिक प्राधिकरण असतानाही त्यांच्याकडे अभिलेख नाही म्हणून माहिती देऊ शकणार नाहीत व ट्रस्टकडे माहिती असूनही ते सार्वजनिक प्राधिकरण नाही, म्हणून माहिती नाकारली जाईल.

आयोग, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (८) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण) व या प्रकरणाशी संबंधित मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी सार्वजनिक न्यास व इतर कायद्याखालील नोंदणीकृत संस्थाद्वारे संचालित, शासन अनुदानप्राप्त महाविद्यालय, विद्यालय व शाळा यांना मान्यता किंवा अनुदान देताना अशी अट समाविष्ट करावी की, शासकीय अनुदानाशी निगडीत सर्व प्रकारचा अभिलेख त्या त्या शैक्षणिक संस्थांमध्ये एका प्राधिकृत अधिकाऱ्याकडे ठेवावा व माहिती अर्ज आल्यास जन माहिती अधिकाऱ्यांमार्फत ती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार देण्यात यावी.

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनीदेखील त्यांच्या स्तरावर उक्त प्रकरणी सर्व संबंधित विभागीय सचिव यांना आवश्यक ते निर्देश देऊन आयोगाच्या आदेशाचे अनुपालन दिनांक १५.०२.२०१९ पर्यंत होईल अशी कार्यवाही करावी व आयोगास दि. १५.०२.२०१९ पर्यंत कळवावे.

**आदेश**

**उक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

अजित कुमार जैन

(अजित कुमार जैन)
राज्य माहिती आयुक्त, ~~बृहन्मुंबई~~

मुंबई
दिनांक : ०८.०१.२०१९

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, गो.ते. रुग्णालय, कॉम्प्लेक्स इमारत,मुंबई-१
मा. रजिस्ट्रार, मुंबई विद्यापीठ, मुंबई